# पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय, पुणे
# चिंचवड पोलीस स्टेशन

**पत्ता:- कामत हॉस्पिटलच्या मागे, चाफेकर चौक, चिंचवडगाव, पुणे - ४११ ०३३.**
**फोन नं. ०२०-२७३५६७६८, २७३५६७६७.**
**E mail ID :- pschinchwad.pcpc-mh@nic.in**


**दि. १३/०३/२०२४**

## चिंचवड पोलीस स्टेशन, तपास पथकाची दमदार कामगीरी

## सराईत गुन्हेगारास पिस्टल बाळगल्या प्रकरणी अटक व त्याचे इतर ०२ साथीदारांकडुन एकुण ०४ घरफोड्या उघडकीस आणुन त्यांचेकडुन ०१ पिस्टल, जिवंत काडतुस, ०३ मोबाईल फोन, ०९ हातातील घड्याळ, नविन कपडे, परफ्युम असा एकुण १ लाख ५०,०००/- रुपयेचा मुद्देमाल जप्त

पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तायाचे कार्यक्षेत्रात बेकायदा पिस्टल बाळगुन त्याव्दारे दहशत पसरविणा-या गुन्हेगारांवर कारवाई करणेबाबत मा. श्री. विनयकुमार चौबे, साो, पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड यांनी सर्व पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी यांना आदेश दिले आहेत.

मा. पोलीस आयुक्त साो, पिंपरी चिंचवड यांनी दिलेल्या आदेशाप्रमाणे दि. ०९/०३/२०२४ रोजी पोलीस उपनिरीक्षक, श्री. आर.जे.व्हरकाटे, पोलीस उप निरीक्षक श्री. अजित दुधे, पो.हवा. ७७१ तोडकर, पो.हवा.१३२२, गायकवाड, मपोहवा १६२० जमदाडे, पो.अंमलदार-२१२३ वानखेडे, पोशि १९८८ मोहीते पो.अंमलदार २१३६ डोके, पोशि २१२१ शेख, पोलीस अंमलदार -२६५३ माने, पोशि २१८० पिंजरकर असे चिंचवड पोलीस ठाणे येथे हजर असताना, १४/०० वा. चे सुमारास चिंचवड पोलीस ठाणे अभिलेखावरील पाहीजे आरोपी, तडीपार आरोपी, रेकॉर्डवरील आरोपी चेक करणे कामी तसेच वाहन चोरी व घरफोडीचे अनुशंगाने चिंचवड पोलीस ठाणे हद्दीत गस्त करत असताना, गुप्त बातमीदारा मार्फत पोलीस अंमलदार पंकज भदाणे यांना खात्रीशीर माहीती प्राप्त झाली की, त्याप्रमाणे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. जितेंद्र कोळी, यांचे आदेशान्वये पोलीस उप निरीक्षक आर.जे.व्हरकाटे यांनी १६/३० वा. चे सुमारास बिजलीनगर चौकाकडुन आकुर्डीकडे जाणा-या नागसेननगर झोपडपट्टी रेल्वे पटरीजवळील ब्रिजखाली, सर्व स्टाफला सुचना देवून आम्ही वेगवेगळया ठिकाणी सापळा रचून थांबलो असता, १७/१५ वा. चे सुमारास बातमी प्रमाणे वरील वर्णनाचा एक इसम बिजलीनगर चौकाकडुन आकुर्डीकडे जाणा-या नागसेननगर झोपडपट्टी रेल्वे पटरीजवळील ब्रिजखाली, चानाक्ष नजरेने उभा राहून कोणाची तरी वाट पाहत थांबलेला दिसला. त्यावेळी आमची व पंचाची बातमीप्रमाणे तोच इसम आहे अशी खात्री झाल्याने आम्ही त्याचे दिशेने कुच करताच त्यास पोलीसांची चाहुल लागल्याने तो रेल्वे पटरीच्या दिशेने पळुन जात असताना पोउनि व्हरकाटे यांनी इशारा करताच आम्ही सदर इसमाचे दिशेने पुढे जाऊन त्यास वरील स्टाफच्या मदतीने १७/३० वा. चे सुमारास पकडुन, त्याचा नाव पत्ता विचारला असता त्याने सुनिल मारुती लोणी, वय २२ वर्षे, धंदा - काहीनाही रा. बिजलीनगर नलावडे वस्ती रेलविहार शेजारी चिंचवड पुणे असे नाव सांगुन त्याची अंगझडती घेतली असता सदर इसमाचे ताब्यात मिळून आलेले पिस्टल, काडतुसे व शर्टाचे वरील खिशात रुपये ५०००/- त्यामध्ये ५००/- रुपयांच्या एकुण १० नोटा मिळुन एकुण रुपये ४७,०००/- इतका मुद्देमाल मिळुन आला. तसेच पोलीस स्टेशन कडील अभिलेख पडताळला असता तो तडीपार आरोपी असल्याचे दिसुन आले.

नमुद आरोपीत याचेवर **चिंचवड पोलीस ठाणे गुरनं ७२/२०२४ भारतीय हत्यार कायदा कलम ३, (२५) व महाराष्ट्र पोलीस ॲक्ट कलम १४२, ३७ (१) सह १३५, प्रमाणे** गुन्हा दाखल केला असुन त्याने तपासादरम्यान त्याचे इतर साथीदारांसह घरफोडी केल्याचे कबुल झाल्याने त्याप्रमाणे तपास करुन त्याचे इतर ०२ साथीदार नामे प्रथमेश मुकुंद मोदी, वय २२ वर्षे,रा.सुगम हौ.सो.य.सोसायटी, रुपीनगर, तळवडे, पुणे २) सौरभ दत्तात्रय शिंदे, वय २३ वर्षे, रा- श्रीराम कॉलणी,बळवंत नगर,चिंचवड पुणे यांचा तपास पथकाने शोध घेवुन त्यांना ताब्यात घेतले असुन त्यांचेकडुन खालील पोलीस स्टेशन हद्दीत घरफोडी केल्याचे दिसुन उघडकीस आले आहे. त्यामध्ये एकुण रुपये ०१ लाख ५०,०००/- रुपयांचा मुद्देमाल जप्त करणेत आला आहे.

| **अ.क्र.** | **पोलीस स्टेशन नाव** | **गुरनं कलम** |
|---|---|---|
| **१** | **चिंचवड पोलीस स्टेशन** | **२५/२०२४ भादविक ३८०, ४६१** |
| **२** | **चिंचवड पोलीस स्टेशन** | **१४/२०२४ भादविक ४५७, ३८०** |
| **३** | **वाकड पोलीस स्टेशन** | **२४४/२०२४ भादविक ३८०, ४५७, ४२७,३४** |
| **४** | **वाकड पोलीस स्टेशन** | **२२०/२०२४ भादविक ४५४, ४५७, ३८०, ३४** |

सदरची कामगिरी ही मा. पोलीस आयुक्त सो. श्री. विनयकुमार चौबे, मा. अपर पोलीस आयुक्त सो. श्री. वसंत परदेशी, मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ - १ श्रीमती स्वप्ना गोरे, सो, सहा. पोलीस आयुक्त चिंचवड विभाग श्री. राजु मोरे सो, यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. जितेंद्र कोळी, तपास पथकातील पोलीस उप निरीक्षक श्री. आर.जे.व्हरकाटे, पोलीस उप निरीक्षक श्री. ए.बी.दुधे, पोलीस अंमलदार सहा.पोलीस फौजदार पांडुरंग जगताप, पोहवा धर्मनाथ तोडकर, पोहवा संतोष गायकवाड, मपोहवा भाग्यश्री जमदाडे, पोशि रोहीत पिंजरकर, उमेश मोहीते, रहीम शेख, पकंज भदाणे, गोविंद डोके, अमोल माने, जितेंद्र उगले, उमेश वानखडे, यांनी मिळुन केली आहे.

**(स्वप्ना गोरे)**
**पोलीस उपायुक्त**
**परिमंडळ १, पिंपरी चिंचवड**